# कार्यालय नगर पंचायत घनसावंगी, जि.जालना

## Walk in interview

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत घेण्यात येणाऱ्या स्वच्छ सर्वेक्षणाकरीता नगर पंचायत घनसावंगी येथे स्वच्छ सर्वेक्षण तसेच इतर अनुषंगिक कामे करण्याकरिता एकत्रित वेतनावर तात्पुरत्या स्वरुपात केवळ 11 महिन्यासाठी शहर समन्वयक (City Co-ordinator) यांची नियुक्ती करावयाची आहे. तसेच प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत (PMAY) घनसावंगी नगर-पंचायत येथे तांत्रिक मदत करणेसाठी शहरस्तरीय तांत्रिक कक्षातील तज्ञांच्या एकत्रित वेतनावर तात्पुरत्या स्वरुपात केवळ 11 महिन्यासाठी शहरस्तरीय तांत्रिक तज्ञ (CLTC) यांची नियुक्ती करावयाची आहे. करीता खालील नमुद केलेल्या कंत्राटी पद भरण्यासाठी दिनांक 28/11/2022 सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत नगर पंचायत, घनसावंगी जि. जालना येथे विहीत नमुन्यात अर्ज आवश्यक कागदपत्रासह सिलबंद लिफाफ्यात स्विकारण्यात येणार आहे. अर्जाचा विहित नमुना तसेच पद भरती बाबतच्या सर्व अटी व शर्ती नगर पंचायत, घनसावंगी कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील तसेच प्राप्त करता येईल.तरी इच्छुक / पात्र उमेदवारांनी आवश्यक त्या शैक्षणिक, अनुभव प्रमाणपत्रे व इतर आवश्यक कागदपत्रांसह अर्ज विहित मुदतीत सादर करावा. अर्ज छाननी अंती पात्र उमेदवारांना मुलाखतीचा दिनांक व वेळ स्वतंत्ररित्या ईमेलद्वारे / व्हॉटसअप द्वारे कळविण्यात येईल.

| अ. क्र. | पदाचे नाव | एकूण पदे | एकत्रित मासिक मानधन (सर्व कपातीसह) | शैक्षणिक पात्रता व अनुभव | वयोमर्यादा | अर्ज सादर करण्याची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | शहर समन्वयक (City Co-ordi-nator) | 01 | 45,000/- (अक्षरी पंचेचाळीस हजार रुपये मात्र) | 1. मान्यता प्राप्त विद्यापीठातील खालील पैकी कोणत्याही शाखेतील पदवी<br>i) बी.ई./बि.टेक (कोणतीही शाखा)<br>ii) बी. आर्क (iii) बी. प्लॅनिंग<br>(iv) बि.एस.सी (कोणतीही शाखा)<br>2) अनुभव<br>स्थानिक स्वराज्य संस्था (नागरी) कार्यालयाशी कर निगडीत कामाचा किमान सहा महिन्याचा अनुभव आवश्यक आहे. शहर समन्वयक म्हणून अनुभव धारण केलेल्या उमेदवारास प्राधान्य. | कमाल वयोमर्यादा 35 वर्षे (शहर समन्वयक म्हणून अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास अनुभव वयोमर्यादा शिथिल करता येईल) | दिनांक 21/11/2022 ते 28/11/2022 सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत |
| 2 | शहरस्तरीय तांत्रिक तज्ञ (CLTC) | 01 | 35,000/- (अक्षरी पस्तीस हजार रुपये मात्र) | 1. पदवी व पदवीतर पदवी (स्थापत्य अभियंता)<br>2. बांधकाम Design आणि पर्यवेक्षण (Super-vision) क्षेत्रातील किमान 03 वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य<br>3. MS-CIT (MS-WORD, MS-EXEL. MS- POWER POINT ज्ञान आवश्यक ) Auto Card व इतर स्थापत्य अभियांत्रिकी संबंधीत तांत्रिक प्रमाणपत्र / अभ्यासक्रम प्राप्त केले असल्यास प्राधान्य.<br>4. नगर परिषद अथवा महानगरपालिका मध्ये बांधकाम अभियंता म्हणून कार्य केले असल्यास प्राधान्य. 5. मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक | कमाल वयोमर्यादा 35 वर्षे (शहर समन्वयक म्हणून अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास अनुभव वयोमर्यादा शिथिल करता येईल) | |

अटी व शर्ती - प्राप्त होणारे एक अथवा सर्व अर्ज नाकारण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवले आहे.

स्वाक्षरीत<br>
मुख्याधिकारी<br>
नगर पंचायत घनसावंगी